लोकमत

## ‘कदाचित अजूनही’ कवितासंग्रहाचा गौरव

# अनुराधा पाटील यांना साहित्य अकादमी पुरस्कार

लोकमत न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** स्त्रियांच्या जीवनातील दु:खाला, एकाकीपणाला व सोशिकतेला स्वतंत्र बाण्याने शब्दरूप करणाऱ्या



मराठीतील आघाडीच्या कवयित्री अनुराधा पाटील यांना उत्कृष्ट साहित्यासाठीचा साहित्य अकादमी पुरस्कार बुधवारी जाहीर झाला.

पाटील यांना ‘कदाचित अजूनही’ या कवितासंग्रहासाठी हा पुरस्कार मिळाला. डॉ. आसाराम लोमटे, लक्ष्मण माने व वासुदेव सावंत यांच्या निवड मंडळाने पाटील यांची पुरस्कारासाठी एकमताने निवड केली. तांब्याचे कोरीव तबक, शाल व एक लाख रुपये रोख असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. २५ फेब्रुवारीला दिल्लीत साहित्योत्सवात याचे वितरण होईल. नीलबा खांडेकर यांच्या ‘द वर्डस्’ या कवितासंग्रहाला कोकणी भाषेतील पुरस्कार जाहीर झाला आहे.

जामनेर तालुक्यातील पहूर येथे जन्मलेल्या पाटील यांचे ‘कदाचित अजूनही’च्या आधी ‘दिगंत’, ‘तरीही’, ‘दिवसेंदिवस’ व ‘वाळूच्या पात्रात मांडलेला खेळ’ हे कवितासंग्रह प्रसिद्ध झाले आहेत. मराठवाडा साहित्य परिषदेचा प्रा. नरहर कुरुंदकार पुरस्कार, राज्य सरकारचा उत्कृष्ट काव्यासाठीचा केशवसूत पुरस्कार, अमेरिकेतील महाराष्ट्र फाउंडेशनचा पुरस्कार व बहिणाबाई पुरस्कार त्यांना मिळाला आहे.

साहित्य अकादमीने इंग्रजी व भारतीय भाषांमधील गेल्या पाच वर्षातील साहित्यकृतींना २३ पुरस्कार जाहीर केले. यातील सात पुरस्कार कवितासंग्रहांना आहेत. चार कादंबऱ्या, सहा लघुकथासंग्रह, तीन ललित निबंधसंग्रह व संकीर्ण, आत्मचरित्रपर व चरित्रपर लिखाणाच्या प्रत्येकी एका साहित्यकृतीची पुरस्कारसाठी निवड करण्यात आली आहे.

मुलाखत/७

# कवयित्री अनुराधा पाटील यांना यंदाचा साहित्य अकादमी पुरस्कार

**विशेष प्रतिनिधी, नवी दिल्ली**

**समकालीन मराठी** साहित्यात मोलाची भर घालणाऱ्या ज्येष्ठ कवयित्री अनुराधा पाटील यांना यंदाचा साहित्य अकादमी पुरस्कार जाहीर झाला. त्यांच्या 'कदाचित अजूनही' या काव्यसंग्रहाला हा पुरस्कार मिळाला आहे. मराठीसह २३ भाषांतील साहित्य पुरस्कारांची बुधवारी अकादमीचे सचिव डॉ. के. श्रीनिवासराव यांनी घोषणा केली.

साहित्य अकादेमी

एक लाख रुपयांच्या या पुरस्काराचे २५ फेब्रुवारी रोजी दिल्लीत वितरण होणार आहे.

नागपूर येथील कविकुलगुरू कालिदास संस्कृत विद्यापीठाच्या भारतीय धर्म, तत्त्वज्ञान व संस्कृती



अनुराधा पाटील

विभागाचे अधिष्ठाता प्रो. मधुसूदन पेन्ना यांना संस्कृत महाकाव्य 'प्रज्ञाचाक्षुषम्'करिता पुरस्कार जाहीर झाला आहे. इंग्रजीमध्ये शशी थरूर यांच्या 'एरा ऑफ डार्कनेस' (कथेतर गद्य) पुस्तकाचीही साहित्य पुरस्कारासाठी निवड करण्यात आली. कोंकणीमध्ये नीलबा खांडेकर यांच्या 'द वर्ड्स' या कवितासंग्रहालाही पुरस्काराने नावाजण्यात आले. सात कवितासंग्रह, सहा कथासंग्रह, तीन निबंध, एक कथेतर गद्य आणि एक आत्मचरित्र अशा पाच साहित्य प्रकारांना २०१९चा साहित्य पुरस्कार देण्यात आला आहे. मराठी साहित्यासाठी आसाराम लोमटे, लक्ष्मण माने आणि वासुदेव सावंत हे तिघे परीक्षक होते. नेपाळी भाषेतील पुरस्कार जाहीर झालेला नाही.

## साहित्यिक-साहित्य-भाषा

■ कविता : फुकनचंद्र बसुमतारी (खाइ आथुमविफ्राय- बोडो), नंदकिशोर आचार्य (छीलते हुए अपने को- हिंदी), कुमार मनीष अरविंद (जिनगीक ओरिआओन करैत- मैथिली), नीलबा खांडेकर (द वर्ड्स-कोंकणी), व्ही. मधुसुदनन नायर (अचन पिरन्ना वीडू- मल्याळम), अनुराधा पाटील (कदाचित अजूनही- मराठी), पेन्ना- मधुसुदन (प्रज्ञाचाक्षुषम् -संस्कृत)

■ कादंबरी : जयश्री महंत (चाणाक्य- आसामी), बेरिल थंगा (ई अमादी अदुनगीगी ईठत- मणिपुरी), चो. धर्मन (सूल- तमिळ), बंदी नारायण स्वामी (सेप्ताभूमी- तेलुगु)

■ कथा : अब्दुल अहद हाजिनी (अख याद अख कयामत- काश्मिरी), तरुण कांति मिश्र (भास्वती- ओडिया), किरपाल कजाक (अंतहिन-पंजाबी), रामस्वरूप किसान (बारीक बात- राजस्थानी), काली चरण हेम्ब्रम (सिसिरजली- संताली), ईश्वर मूरजाणी (जीजल- सिंधी)

■ निबंध : चिन्मय गुहा (घुमेर दरजा ठेले- बाङ्ला), ओम शर्मा जद्रंयाडी (बंदरालता दर्पण- डोंगरी), रतिलाल बोरीसागर (मोजमा रें वुं रे!- गुजराती),

■ कथेतर गद्य: शशी थरूर (ॲन एरा ऑफ डार्कनेस- इंग्रजी), शाफे किडवई (सवनेह ए सर सैयद- उर्दू- चरित्र), विजया (कुडी एसरू- कन्नड- आत्मचरित्र)

# अनुराधा पाटील, शशी थरूर यांना 'साहित्य अकादमी'

## २३ भाषांसाठी पुरस्कार जाहीर

वृत्तसंस्था, नवी दिल्ली

काँग्रेस नेते आणि लेखक शशी थरूर, मराठी कवयित्री अनुराधा पाटील, नागपूरचे पेन्ना मधुसूदन (संस्कृत), हिंदी साहित्यिक नंदकिशोर आचार्य यांच्यासह २३ साहित्यिकांना बुधवारी साहित्य अकादमी पुरस्कार जाहीर झाले. २०१९ या वर्षासाठी अकादमीने या पुरस्कारांची घोषणा केली.

थरूर यांना 'अॅन इरा ऑफ डार्कनेस' या पुस्तकास, अनुराधा पाटील यांना 'कदाचित अजूनही' या काव्यसंग्रहास, नंदकिशोर आचार्य यांना 'छीलते हुए अपने को' या हिंदी काव्यसंग्रहासाठी हे पुरस्कार जाहीर झाले आहेत. २३ भाषांसाठी हे पुरस्कार घोषित करण्यात आले. सात कवितासंग्रह, सहा कथासंग्रह, तीन निबंध, एक कथेतर गद्य आणि आत्मचरित्र आदी साहित्य प्रकारांचा त्यात समावेश आहे.

बुधवारी साहित्य अकादमीचे अध्यक्ष चंद्रशेखर कंबार यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीमध्ये या पुरस्कारांची घोषणा करण्यात आल्याचे अकादमीचे सचिव के. श्रीनिवास राव यांनी म्हटले आहे. फुकन बासुमतरी (बोडो), नंदकिशोर आचार्य (हिंदी), निबा खांडेकर (कोंकणी), कुमार मनीष अरविंद (मैथिली), व्ही. मधुसूदन नायर (मल्याळी), अनुराधा पाटील (मराठी) या कवींना पुरस्कार जाहीर झाला आहे. २५ फेब्रुवारी २०२० रोजी नवी दिल्लीतील एका विशेष कार्यक्रमात या पुरस्कारांचे वितरण करण्यात येणार आहे, अशी माहिती साहित्य अकादमीकडून करण्यात आली आहे.

## 'तरुण वाचतात याचा आनंद मोठा'




औरंगाबाद : 'पुरस्कार जाहीर झाल्याचा आनंद आहे. तरुणांचे अभिनंदनाचे फोन येत आहेत. अजूनही तरुण मुले उत्साहाने वाचत आहेत. यापेक्षा मोठा आनंद कुठला,' असे भावोद्गार साहित्य अकादमी पुरस्का जाहीर झालेल्या ज्येष्ठ कवयित्री अनुराधा पाटील यांनी काढले. 'कदाचित अजूनही' हा माझा पाचवा कवितासंग्रह आहे. त्याला पुरस्कार मिळाला, याबद्दल मी आनंदी आहे, असे अनुराधा पाटील म्हणाल्या.

# आचार्य सहित 23 को साहित्य अकादमी पुरस्कार



नंदकिशोर आचार्य

# अनुराधा पाटील यांच्या 'कदाचित अजूनही'ला साहित्य अकादमी



मुंबई, दि. १८ (प्रतिनिधी) - साहित्य विश्वातील प्रतिष्ठेचा समजला जाणारा साहित्य अकादमी पुरस्कार कवयित्री अनुराधा पाटील यांना 'कदाचित अजूनही' या काव्यसंग्रहासाठी जाहीर झाला आहे. एक लाख रुपये आणि ताम्रपट असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

२०१९ सालच्या साहित्य अकादमी पुरस्कारांची घोषणा बुधवारी झाली. २३ भाषांतील साहित्यिकांना हे पुरस्कार देण्यात येणार आहेत. यामध्ये सात कवितासंग्रह, चार कादंबरी, सहा लघुकथासंग्रह, तीन निबंध संग्रह, एक काल्पनिक कथासंग्रह, आत्मचरित्र, चरित्र ग्रंथ यांचा समावेश आहे. १ जानेवारी २०१३ ते ३१ डिसेंबर २०१७ या कालावधीत प्रकाशित करण्यात आलेल्या साहित्यांचा या पुरस्कारासाठी विचार करण्यात आला. २५ फेब्रुवारी २०२० रोजी हा पुरस्कार प्रदान समारंभ नवी दिल्ली येथे होणार असल्याची माहिती साहित्य अकादमीचे अध्यक्ष डॉ. चंद्रशेखर कंबार यांनी दिली. साहित्य अकादमीचा पुरस्कार मिळवणाऱ्या अनुराधा पाटील या ६५ व्या मराठी साहित्यिक ठरल्या आहेत. इंग्रजीचे खासदार शशी थरूर यांच्या 'एन एरा ऑफ डार्कनेस' या कथाबाह्य गद्य पुस्तकासाठी पुरस्कार जाहीर झाला आहे. तर कोकणी भाषेसाठी निलबा खांडेकर यांच्या 'द वर्ड्स' या काव्यसंग्रहाला जाहीर झाला आहे.